जिल्हा परिषद / पंचायत समितीची
आमसभा बोलाविण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
परिपत्रक क्र.जिप्आ - 1098 / सीआर-155 / 05,
मंत्रालय, मुंबई : 400 032, दिनांक : ५ नोव्हेंबर, 1998.

वाचा :
1. शासन परिपत्रक, ग्राम विकास विभाग क्र.पीआरसी-1077 / 3918 / 710/(3)/बारा, दिनांक 10 मे , 1978
2. शासन परिपत्रक, ग्रा.वि.वि.क्र.पीआरसी 1078/2570/(1615)/12, दि.16 ऑक्टोबर 1979,
3. शासन परिपत्रक, ग्रा.वि.वि.क्र.पीआरसी 1086/सीआर 237/05, दि.18/11/1986
4. शासन परिपत्रक, ग्रा.वि.वि.क्र. पीआरसी 1086/939/सीआर 296/05, दि.23/2/1987
5. शासन निर्णय, ग्रा.वि.वि.क्र. विराआ 1090/70/55/05, दि.26 मार्च 1990
6. शासन परिपत्रक, ग्रा.वि.वि.क्र. जिप्आ 1090/30/प्र.94/05,दि.27.2.91
7. शासन परिपत्रक, ग्रा.वि.वि.क्र. झेडपीई-1092/सीआर 159/05, दि.19.6.92,
8. शासन परिपत्रक, ग्रा.वि.वि.क्र. झेडपीई 1093/593/प्र.क्र.716/05, दि.23 डिसेंबर 1993
9. शासन परिपत्रक, ग्रा.वि.वि.व ज.सं.वि.क्र. झेडपीई 1095/प्र.क्र.1020/05, दि.22 मार्च 1995.

## परिपत्रक

पंचायत राज समितीने आपल्या 1976-77 च्या आठव्या अहवालात परि.1.10 व 2.2 मधील केलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने सर्व जिल्हा परिषदांनी वर्षातून एकदा म्हणजे पुढील वर्षाच्या कामकाजाची आखणी करण्यापूर्वी आमसभा बोलवावी असे आदेश वर प्रस्तावनेत अ.क्र.1 येथे उल्लेखिलेल्या परिपत्रकाव्दारे निर्गमित केले आहेत. त्यानंतर अशा आमसभा बाबत वर प्रस्तावनेत नमूद केलेल्या परिपत्रकांव्दारे वेळोवेळी आदेश निर्गमित केले असून एकत्रित संकलन करुन सर्व समावेशक आदेश काढणे जरुरीचे असल्यामुळे सर्व जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना पंचायत राज समितीच्या वर उल्लेखिलेल्या शिफारशीच्या अनुषंगाने आजतागायत काढलेल्या आदेशांचे एकत्रिकरण करुन पुढील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. माहितीसाठी उक्त शिफारशीची प्रत सोबत जोडण्यात आलेली आहे.



Scanned by CamScanner

1. जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांनी वर्षातून एकदा म्हणजे पुढील वर्षाच्या कामकाजाची आखणी करण्यापूर्वी अशा आमसभा बोलवाव्यात. या आमसभांमध्ये मुख्यत: कोणते विषय चर्चेला घ्यावेत याविषयी आगाऊ सूचना संसद सदस्य व इतर यांच्याकडून मागवून घ्याव्यात व त्या अनुरोधाने त्या आमसभेचे कामकाज पुरे करावे. या आमसभा बोलविताना अशी आमसभा पंचायत समित्यांनी जिल्हा परिषदेची आमसभेपूर्वी एक महिना आधी घ्यावी. व त्या सभेत झालेले निर्णय व लोकप्रतिनिधींनी केलेल्या सूचना जिल्हा परिषदेला कळवाव्यात. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाबाबतच्या विषयावर व कार्यक्रमावर व त्या अनुषंगाने आर्थिक तरतूदीबाबत सर्वसाधारणपणे चर्चा व्हावी. याबाबत पंचायत राज समितीने आपल्या आठव्या अहवालात परि.1.10 व 2.2 मध्ये स्पष्टपणे विवेचन केले आहे. त्याचा विचार करुन तसेच जिल्हा परिषदेच्या आमसभेमध्ये जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समितीकडून आलेल्या सूचनांचा विचार करुन तद्संबंधी निर्णय घेऊन त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेने आपला पुढील वर्षाचा कार्यक्रम निश्चित करावा.

2. जिल्हा पातळीवरील आमसभेस जिल्हा परिषदेद्वारे कार्यान्वित होणा-या योजनांशी संबंधित अधिका-यांना बोलाविण्यात यावे.

3. जिल्हा पातळीवरील सभेचे अध्यक्षस्थान कोणी स्विकारावे याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार जिल्हा परिषदेच्या अध्यक्षास असेल.

4. ज्या पंचायत समिती क्षेत्रात 2 आमदार असतील तेथे आमसभेचे अध्यक्ष पद संबंधित पंचायत समिती क्षेत्रात जो आमदार जास्त क्षेत्राचे [ Jurisdiction ] प्रतिनिधीत्व करीत असेल त्याला देण्यात यावे.

5. आमदार, खासदार यांचा प्रवासभत्ता व दैनिक भत्त्यावरील खर्च जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पन्नातून करावा. तसेच आमसभेस येणा-या जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना दैनिकभत्ता व प्रवासभत्ता अनुज्ञेय राहील. त्याचाही खर्च जिल्हा परिषदेने स्वत:च्या उत्पन्नातून करावा. मात्र पंचायत समितीने आमसभेत बोलाविलेल्या सहकारी संस्थांचे पदाधिकारी आणि सामाजिक कार्यकर्ते इत्यादींना त्यांचा स्वत:चा खर्च स्वत:च करावा लागेल. या सभेत जिल्हा परिषदेच्या माजी सदस्यांना आमंत्रित करण्यास हरकत नाही. तथापि, त्यांनी स्वखर्चाने सभेस यावे. माजी जिल्हा परिषद सदस्यांना आमसभेस उपस्थित राहण्याकरीता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

..3..

Scanned by CamScanner

6. आमसभा ही जिल्हा परिषदेची वैधानिक सभा नसून अनौपचारिक सभा आहे. म्हणून तिला जिल्हा परिषदेच्या कामकाजाचे नियम लावता येणार नाहीत. तथापि, जिल्हा परिषद योजना व कामे यांच्याशी ही सभा संबंधित असल्यामुळे सभा बोलाविणे, हजेरी पत्रक ठेवणे इत्यादी बाबत जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेत जी पध्दत अवलंबिली जाते तीच पध्दत त्या सभेच्या बाबतीत अवलंबिण्यात यावी.

7. वार्षिक प्रशासन अहवाल मंजूर करते वेळी म्हणजे ऑक्टोबर महिन्यात आमसभा घेणे गैरसोईचे होते. जिल्हा परिषदेने वर्षातून एकदा त्यांना सोईस्कर होईल अशावेळी आमसभा बोलवावी. आमसभा केव्हा घ्यावी हे ठरविण्याचा अधिकार संपूर्णपणे जिल्हा परिषदेला राहिल. हाच नियम पंचायत समितीच्या आमसभेला लागू हाईल. पंचायत समितीची आमसभा पंचायत समितीच्या सभापतीच्या सल्ल्याने त्याचप्रमाणे सभापती व आमदार यांच्या सामंजस्याने ठेवण्यात यावी.

8. सदर आमसभांना संसद सदस्य व विधान सभा सदस्य यांच्याप्रमाणे विधान परिषद सदस्यांना आमंत्रित करण्यात यावे.

9. मुख्य कार्यकारी अधिकारी हे प्रशासक या नात्याने जेथे जिल्हा परिषदेचे काम पहात असतील तेथे त्यांनी जिल्हा परिषदेची आमसभा बोलवावी.

10. जिल्हा परिषद पंचायत समिती यांनी दरवर्षी नियमितपणे आमसभा बोलाविल्या नाहीत तर संबंधित विभागीय आयुक्तांनी आमसभा बोलवाव्यात.

11. ज्या बैठकांना आमदार महोदयांची उपस्थिती आवश्यक आहे अशा बैठका विधीमंडळ अधिवेशन काळात आयोजित करुन नयेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( रा.का.पवार )
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

1. सर्व जिल्हा परिषदेचे अध्यक्ष.
2. सर्व पंचायत समित्यांचे सभापती.
3. सर्व विभागीय आयुक्त.
4. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
5. सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी.
6. ग्राम विकास व जलसंधारण विभागातील अधिकारी व कार्यासने.
7. अवर सचिव, का.क्र.57, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.
8. निवड नस्ती, का.क्र.05, ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

Scanned by CamScanner